नि.फौ.ख.क्र.७७१/२०१८
शासन–वि– सज्जू पठाण
नि.क्र. २२

मी शपथेवर खरे सांगते की,

माझे नांव – संध्या राजू रहांगडाले,
वय अंदाजे ६० वर्ष, कामधंदा– गृहिणी,
राहणार– स्टेशन फैल, वर्धा, तह. व जि. वर्धा.

.............................................................................................................

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ ची सरतपासणी– सरकारी वकील सौ.ज्योती लकडे यांच्या मार्फत.**

१. मी आरोपीला ओळखते. ते माझे घरासमोर राहतात. मोना ही माझी मुलगी आहे. पायल ही माझी सून असून ललीत माझा मुलगा आहे. फिर्यादी पती सन २०१६ मध्ये मरण पावल्यामुळे ती आमचेकडे राहते. घटना अंदाजे सहा ते सात वर्षापूर्वी सकाळी आमच्या घरासमोरील सार्वजनिक रस्त्यावर घडली. त्याठिकाणी आरोपी आली व तिने वाद घालून आम्हाला शिवीगाळ केली की, 'साली छिनाल, तू वेश्याचा धंदा करते' असे म्हणून आम्हाला जिवे मारण्याची धमकी दिली. आम्हाला भिती वाटली.

**आरोपीतर्फे उलट तपास – कु.के.पी.गडपाल लोकअभिरक्षक अधिवक्ता**

२. घटनेच्या वेळी माझे नातू माझेसोबत राहत होते व ते सकाळी शाळेत जात होते. हे म्हणणे खरे आहे की सकाळी कामाची वेळ असल्यामुळे आम्ही व्यस्त असतो. हे म्हणणे खरे आहे की फिर्यादी औषधीच्या दुकानात काम करते. हे म्हणणे खरे आहे की बक–यांवरुन आरोपी व माझे मुलामध्ये जुना वाद होता. हे म्हणणे खरे आहे की त्यावरुन आम्ही घरच्यांनी आरोपीविरुध्द फिर्याद देण्याचे ठरविले होते. हे म्हणणे खरे अयाहे की त्यामुळे आम्ही फिर्यादीला फिर्याद देण्यास सांगितले. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने आम्हाला कोणतीही शिवीगाळ केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की मी सांगितल्याप्रमाणे कुठलीही घटना घडली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

आरोपीतर्फे उलट तपास पुर्ण

फेरतपास नाही.

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्वीक्रुती | माझे समक्ष |
| GAURI VIRENDRA JANGDE DESHPANDE Digitally signed by GAURI VIRENDRA JANGDE DESHPANDE Date: 2025.11.24 17:21:31 +0530 | GAURI VIRENDRA JANGDE DESHPANDE Digitally signed by GAURI VIRENDRA JANGDE DESHPANDE Date: 2025.11.24 17:21:36 +0530 |
| (जी.व्ही.जांगडे–देशपांडे) | (जी.व्ही.जांगडे–देशपांडे) |
| मुख्य न्यायदंडाधिकारी, | मुख्य न्यायदंडाधिकारी, |
| वर्धा, दिनांक २०–११–२०२५ | वर्धा, दिनांक २०–११–२०२५ |